॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
Phone : (02462) 229246
Fax : (02462) 229572
OFFICE OF THE REGISTRAR
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmunregistrar@gmail.com

जावक क्रमांक आस्था/०२/२०२०–२१/११

दिनांक १५–०४–२०२०

— परिपत्रक —

प्रस्तुत विद्यापीठातील परिसर, उपपरिसर, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली तसेच कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, कोव्हीड–१९ कोरोना व्हायरसच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून विद्यापीठातील आणि उपपरिसरातील सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाज बंद ठेवण्यात आलेले असून, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी कर्मचारी यांना वर्क फ्रॉम होम च्या सूचना दिलेल्या असून, आवश्यकतेनुसार कार्यालयात उपस्थित राहण्यासंदर्भात सूचित केलेले आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, काही शिक्षक, अधिकारी, कर्मचारी हे कोरोना व्हायरससाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनाने त्यांना पाचारण केल्यानंतर किंवा बोलाविल्यानंतरही कार्यालयात उपस्थित होत नाहीत. दूरध्वनी न स्वीकारणे, ई–मेलला प्रतिसाद न देणे अशा बाबींची पुनरावृत्ती ते वारंवार करत आहेत.

लॉकडाऊनच्या काळात बरेच शिक्षक, अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी न थांबता प्रशासनाची कोणतीही लेखी परवानगी न घेता अथवा कोणत्याही प्रकारे लेखी कल्पना न देता, बाहेरगांवी अथवा मुख्यालय सोडून इतरत्र गेलेले असल्याचे आढळून आलेले आहेत, ही बाब अतिशय गंभीर आहे.

या अनुषंगाने सर्व शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी यांना कळविण्यात येते की, वरील बाबींची पुनरावृत्ती झाल्यास सेवाशर्ती नियमांनुसार आणि आपत्ती व्यवस्थापन कायदयातील तरतूदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कुलसचिव

प्रति,
(१) सर्व संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले/प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
(२) संचालक, उपपरिसर, लातूर व परभणी, प्रस्तुत विद्यापीठ
(३) प्रभारी प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ
(४) समन्वयक, कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.
(५) श्री. अजय दर्शनकार, सिस्टिम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ (प्रत संकेतस्थळावर ठेवण्यासाठी)

प्रत माहितीस्तव —
५ मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
६ मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.